**<u>वादींतर्फे साक्षीदार क्र.१ ची सरतपासणी शपथेवर पुन्हा सुरु</u> -**

**६.** मी, नाझनिन इमामुद्यीन गोदड, वय ३९ वर्षे, धंदा - गृहिणी, रा. २०२/अे विंग, गार्डन अव्हेन्यू, पाईप कंपांउन्ड, अमृत नगर, मुंब्रा, ता. ठाणे - ४००६१२, स्वतःकरीता व वादी क्र.१ ते ४ ची अखत्यारी म्हणून, सत्यप्रतिज्ञेवर सांगते की, सदरचे पुरावा प्रतिज्ञापत्र मी दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर माझे सांगणेप्रमाणेच लिहीलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यासाठी मी त्यावर सही केलेली आहे.

**७.** वादींनी दाखल केलेल्या दस्तऐवजांपैकी सार्वजनिक दस्तऐवजांना पूर्वीच निशाणी देण्यात आलेल्या आहेत, तसेच कुलमुखत्यारपत्रास **<u>निशाणी ६२</u>** देणेत आली.

(*प्रतिवादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब*)

**समक्ष -**

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**
**दिनांक : ०१ /१२ /२०१६** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**
**दिनांक : ०१ /१२ /२०१६** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u> -**

**<u>प्रतिवादी क्र. ६ तर्फे श्री. ए. पी. बर्वे, वकील</u> -**

८. दावा मिळकती माझे आजोबा फजाक गोधड, यांच्यापासून चालत आलेल्या आहेत. फजाक गोदड यांना किती मुले होती, ही बाब मी दाव्यात नमूद केलेली नाही. प्रतिवादी क्र.१ , मुश्तफा माझा कोण लागतो, ही बाब दाव्यात नमूद केलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र. २ , महम्मद शफी फजाक गोदड, माझा कोण लागतो, ही बाब सुध्दा दाव्यात नमूद केलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र. ३ व ४ हे सुध्दा माझे कोण लागतात, या बाबी दाव्यात नमूद नाहीत. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याशी माझे काय नाते आहे, ही बाब दाव्यात नमूद नाही. दावा मिळकतीत माझा १/४ हिस्सा आहे. उर्वरीत ३/४ हिस्सा कोणाचा आहे, ही बाब दाव्यात नमूद नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यासह माझी दाव्यातील वंशावळ दाव्यात नमूद नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्याशी माझे काय नाते आहे हे मला सांगता येणार नाही, म्हणून ती बाब मी दाव्यात नमूद केलेली नाही. दावा मिळकती प्रथम कोणी मिळविल्या, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत माझा १/४ हिस्सा कसा आहे, हे मला सांगता येणार नाही. मला मराठी वाचता येते. इमामुद्दीन माझे वडिल होते, त्यांच्या मृत्यूची तारीख मी सांगू शकते. प्रतिवादी क्र. ५ ते ९ माझे नातेवाईक नाहीत. त्यांना दाव्यात का सामील केले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व इतर वादी कायमस्वरुपी मुंबई येथेच राहतो.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत आमची स्वतंत्र वहिवाट आहे. दावा मिळकतींपैकी सर्व्हे नंबर ७६/५अ१ मध्ये प्रतिवादी क्र. ६ , परुळेकर याचे स्वतंत्र घर आहे, याची माहिती मला नाही. प्रतिवादी क्र. ६ याने प्रतिवादी क्र. २अ कडून सन २००२ साली त्या मिळकतीपैकी ०.०२.२ एवढी मिळकत खरेदी केली आहे, याची माहिती मला नाही. त्या क्षेत्रावर त्याचा स्वतंत्र कब्जा आहे, याची माहिती मला नाही. त्याने विकत घेतलेले क्षेत्र वेगळे काढून त्याचा स्वतंत्र कब्जा ठेवण्यास माझी हरकत आहे किंवा नाही, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आमची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत वडिलोपार्जित आहे, हे दर्शविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुरावा प्रतिज्ञापत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

*(कोर्टाची वेळ संपल्याने प्रकरण उर्वरीत प्रतिवादींच्या उलटतपासासाठी पुढील तारखेपर्यंत तहकुब)*

**समक्ष -**

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : १६ /०२ /२०१७** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : १६ /०२ /२०१७** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु</u>** -

**<u>प्रतिवादी क्र. ३ ते ५ तर्फे सौ. एन्. एस्. सावंत/रांगणेकर, वकील</u>** -

**११.** *आता साक्षीदारास निशाणी ६६ च्या यादीसोबत हजर केलेले सर्व दस्तऐवज दाखविले.* ते सर्व दस्तऐवज मीच तहसिलदारांकडे हजर केलेले होते. त्या सर्वांमधील मजकूर मला मान्य आहे. त्यांना पूर्वीच निशाणी देणेत आलेल्या आहेत. माझ्या वडिलांचे संपूर्ण नांव इमामुद्दीन फझलु गोदड, असे होते. हे म्हणणे खरे आहे की, इमामुद्दीन फझलु गोदड आणि अब्दुल कादर फझा गोदड, ही दोन्ही नांवे एकाच इसमाची आहेत या अर्थाची प्रतिज्ञापत्रे मी सरपंच व पोलीस पाटील, कुडाळ, यांच्याकडे हजर केली आणि तसे दाखले घेतले. मी सुप्रिया मेहता आणि स्वप्नाली च. पाटकर, यांना ओळखत नाही. त्या कोठे राहतात, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्रमांक ७६० मंजूर करण्यापूर्वी त्याच्या नोटीसेस सर्व संबंधित लोकांना काढणेत आल्या नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे क्षेत्र, तिचा क्रमांक वगैरे वर्णन मला सांगता येणार नाही. दावा मिळकतींचे सर्व्हे नंबर ७६/०१ आणि ७६/०६ असे आहेत, त्यांचे क्षेत्रफळ ०.०३ आणि ०.४० असे अनुक्रमे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती जमीन कोठे आहे हे मला सांगता येणार नाही. ती जमीन कविलकाटे येथे आहे. ती कोणत्या वाडीत आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कविलकाटे येथे ती मिळकत नेमकी कोठे आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींना लागून कोणाच्या मिळकती आहेत, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कविलकाटे किंवा दावा मिळकतीत किंवा इतरत्र कुडाळ येथे माझे घर नाही, मी तारखेसाठी येते तेव्हा हॉटेलमध्ये वास्तव्याला असते.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, इमामुद्दीन फझलु गोदड व अब्दुल कादर फझा गोदड, एकच इसम आहे हे दर्शविण्यासाठी माझेकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत पूर्वी कोणाची होती, कोणाच्या नांवावर होती, कोठून आली, हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकत पूर्वी माझे आजोबा फझा गोदड यांच्या नांवावर होती. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात माझे वडिल इमामुद्दीन फझलु गोदड यांच्या अगोदरची वंशावळ दिलेली नाही. समीर महम्मद शफी गोदड कोठे राहतात, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो मला कधीही भेटलेला नाही.

**१४.** दावा जमिनीत कोणाची घरे व कुंपणे आहेत, हे मला सांगता येणार नाही. त्या जमिनीत प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांची घरे व कुंपणे आहेत, याची माहिती मला नाही. दावा जमिनीत माझा १/४ हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीत माझा १/४ हिस्सा कसा आहे आणि उर्वरीत ३/४ हिस्सा कोणाचा आहे, हे मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ , मुस्तफा, मयत आहे, याची माहिती मला नाही. हे म्हणणे खरे नाही की, इमामुद्दीन फझलु गोदड आणि अब्दुल कादर फझा गोदड, ही एकच व्यक्ति आहे, हे मी खोटे सांगत आहे.

**१५.** माझे व माझ्या भावंडांचे शिक्षण मुंबई येथेच झाले. आमचा जन्म सुध्दा मुंबई येथेच झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल मुंबई येथेच राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, ते मुंबई येथे नोकरीला होते. दावा जमिनीपैकी दहा गुंठे जमीन दि. २५/०८/१९९५ रोजीच्या खरेदीखताने मरीयमबी फझा गोदड, हिने प्रतिवादी क्र. ३ हिला विकत दिलेली आहे, याची माहिती मला नाही. त्याच जमिनीपैकी ६.५ गुंठे क्षेत्र महम्मद शफी फझा गोदड, याने प्रतिवादी क्र. ३ हिला विकत दिलेले आहे, याची माहिती मला नाही. त्या विकत घेतलेल्या क्षेत्रातच प्रतिवादी क्र. ३ , हिचे घर, विहिर, कुपनलिका, झाडे, कुंपण आहे, याची माहिती मला नाही. त्याच जमिनीपैकी ५.५ गुंठे क्षेत्र महम्मद शफी फझा गोदड, याने प्रतिवादी क्र. ४ याला विकत दिलेले आहे, याची माहिती मला नाही. त्याच जमिनीपैकी १.२५ गुंठे क्षेत्र महम्मद शफी फझा गोदड, याने प्रतिवादी क्र. ५ हिला विकत दिलेले आहे, याची माहिती मला नाही. त्या दोन्ही क्षेत्रांमध्ये प्रतिवादी क्र. ४ व ५ यांचे घर व कुंपण आहे, याची माहिती मला नाही.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतींशी आमचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कागदपत्रं तयार करुन खोटा दावा दाखल केलेला आहे व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उर्वरीत प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर</u>** - उलटतपास नाही.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

**समक्ष -**

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : २१ /०३ /२०१७** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**कुडाळ** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : २१ /०३ /२०१७** **दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**